# —: प्रेस नोट:—

## पोलीस विभागातील पोलीस हवालदार अेसीबीच्या जाळयात

नागपूर पोलीस दलातील गणेश रामजी चव्हाण, वय ५१ वर्षे पद — पोलीस हवालदार, पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी. नागपूर शहर यांना १५,०००/— रूपयांची लाच स्विकारतांना अॅन्टी करप्शन ब्युरोच्या पथकाने रंगेहात पकडले आहे. पोलीस विभागाचे पोलीस हवालदार पदाच्या कर्मचाऱ्यावर अॅन्टी करप्शन ब्युरो ने केलेल्या कारवाईमुळे प्रचंड खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, यातील तक्रारदार हे भिम नगर इसासनी नागपूर येथील रहीवासी असुन तक्रारदाराचे साळभाऊ यांचा मुलाचे विरूध्दात पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी. नागपूर येथे एका मुलीने तक्रार अर्ज दिला होता. सदर अर्जावरून तक्रारदार व त्याचे साळभाऊ आणी मुलगा हे पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी. नागपूर येथे बोलविल्याने चौकशी करिता गेले असता दिलेल्या तक्रार अर्जाबाबत पोलीस निरीक्षक यांनी मुलास विचारले असता मुलीला तु सोबत लग्न करावयाचे आहे. यावर मुलाने नकार दिला असता त्यांनी मुलाचे बयाण घेवुन समज देवुन सोडुन दिले. एक महिण्यानंतर सदर तक्रार अर्ज हा चौकशी करिता पोहवा कैलास रामप्रसाद पवार यांचेकडे चौकशी करिता दिला असता त्यांनी तक्रारदारास फोन करून तक्रारदाराचे साळभाऊ यांचा मुलाचे तक्रार अर्जाबाबतचे प्रकरण मिटवण्यासाठी व त्यांच्यावर कोणतीही कायदेशीर कार्यवाही न करण्याकरिता १५०००/—रू लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना पोहवा कैलास रामप्रसाद पवार व त्याचे मदतनीस पोहवा गणेश रामजी चव्हाण यांना लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथील अधिकाऱ्यांना भेटून तक्रार नोंदविली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर चे पोलीस निरीक्षक श्री. सारंग मिराशी यांनी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची अत्यंत गोपनीय रित्या शहानिशा करून पोहवा कैलास रामप्रसाद पवार व त्याचे मदतनीस पोहवा गणेश रामजी चव्हाण यांचे विरूध्द योजनाबध्दरित्या सापळा कारवाईचे आयोजन केले. दि. १९/१२/२०१९ रोजी पोहवा कैलास रामप्रसाद पवार व त्याचे मदतनीस पोहवा गणेश रामजी चव्हाण यांनी तक्रारदाराचे साळभाऊ यांचा मुलाचे तक्रार अर्जाबाबतचे प्रकरण मिटवण्यासाठी व त्यांच्यावर कोणतीही कायदेशीर कार्यवाही न करण्याकरिता १५०००/—रू लाचेची मागणी करून पोहवा गणेश रामजी चव्हाण यांनी पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी. जवळील यादव चहाटपरी येथे लाच रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या चमुने रंगेहात पकडले. त्यावरून पोहवा कैलास रामप्रसाद पवार व त्याचे मदतनीस पोहवा गणेश रामजी चव्हाण यांचेविरूध्द पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी. नागपूर शहर येथे गुन्हा दाखल करण्यात येत आहे. पोहवा गणेश रामजी चव्हाण यांच्या नागपूर येथील निवासस्थानाची अॅन्टी करप्शन विभागाची टीम/चमु द्वारा झडती सुरू आहे.

**सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती रश्मि नांदेडकर, व अपर पोलीस अधीक्षक श्री राजेश दुद्दलवार, अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री सारंग मिराशी, पोलीस निरीक्षक श्री प्रमोद चौधरी, पोहवा दिनेश शिवले, नापोशि मंगेश कळंबे, सारंग बालपांडे, चानापोशि शारीक अहमद लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांनी केलेली आहे.**

पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, नागपूर
दुरध्वनी क्रमांक — ०७१२—२५६१५२०
टोल फ्रि क्रमांक — १०६४